# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४००००८.
दूरध्वनी क्र. ०२२-२३०२३९००. Website: www.msrtc.gov.in फॅक्स नं.०२२-२३०७१३७६.


---

जा.क्र.राप / वाह / चालन / सा.८८/ आतेप्र /६७०२ दिनांक: १३ डिसेंबर २०१९

वाहतूक खाते परिपत्रक क्र.२६/**२०१९**

प्रति,

**उपमहाव्यवस्थापक ,**
**रा प नियंत्रण समिती क्र.१ , २ व ३**

**विभाग नियंत्रक,**
**रा.प.मुंबई /पालघर / ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / नाशिक / धुळे /जळगांव / अहमदनगर / पुणे / सातारा /सांगली / कोल्हापूर / सोलापूर / औरंगाबाद / नांदेड / बीड / परभणी /उस्मानाबाद / लातूर / जालना / अमरावती / यवतमाळ /अकोला / बुलढाणा / नागपूर / वर्धा / चंद्रपूर / भंडारा विभाग**

**विषय: विनावातानुकुलीत शयनयान व शयन आसनी बससेवेसाठी ''आवडेल तेथे कोठेही प्रवास''पास अनुज्ञेय करणे व पासाचे दर अटी व शर्तीबाबत.**

संदर्भ: - राप / वाह / चालन / सा.८८ / आतेप्र / २७४१दिनांक १५.०६.२०१८
(वाहतूक खाते परिपत्रक क्र.१२ /२०१८)

===========

उपरोक्त नमूद केलेल्या वाहतूक खाते परिपत्रक क्र.१२/२०१८ - राप / वाह / चालन / सा.८८/ भाडेवाढ / २७४१ दिनांक १५.०६.२०१८ अन्वये " आवडेल तेथे कोठेही प्रवास " ५या योजनेचे सुधारीत दर कळविण्यात येत आले आहेत.

रा प महामंडळाने दिनांक ०५.०३.२०१९ पासून विनावातानुकुलीत शयनयान व दिनांक १९.११.२०१९ पासून विनावातानुकुलीत शयन आसनी बससेवा चालनात आणली आहे. सदर बसमध्ये ७दिवस व ४ दिवस आवडेल तेथे प्रवास पास योजना अनुज्ञेय करणेसाठी सादर केलेल्या प्रस्तावास मा.सक्षम प्राधिकारी यांनी मंजुरी दिलेली आहे.तदअनुषंगाने विनावातानुकुलीत शयनयान व शयन आसनी बससेवेसाठी ७दिवस व ४ दिवस आवडेल तेथे प्रवास पास योजनेचे दर खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत.

या पासांच्या योजनेसाठी खालील प्रमाणे दोन हंगाम आहेत.

१. गर्दीचा हंगाम - १५ ऑक्टोबर ते १४ जून.
२. कमी गर्दीचा हंगाम - १५ जून ते १४ ऑक्टोबर.

**विनावातानुकुलीत शयनयान व शयन आसनी बससेवेचे आवडेल तेथे प्रवास पास योजनेचे दर**

| वाहतूक सेवेचा प्रकार | ७ दिवसाच्या पासाचे मुल्य | | | | ४ दिवसाच्या पासाचे मुल्य | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | गर्दीचा हंगाम | | कमी गर्दीचा हंगाम | | गर्दीचा हंगाम | | कमी गर्दीचा हंगाम | |
| | प्रौढ | मुले | प्रौढ | मुले | प्रौढ | मुले | प्रौढ | मुले |
| महाराष्ट्र राज्यात | **११२५** | **९६५** | **१७७५** | **८९०** | **११०५** | **५५५** | **१०२०** | **५१५** |
| आंतरराज्य मार्ग | **२०७०** | **१०४०** | **११२५** | **९६५** | **१११०** | **६००** | **११०५** | **५५५** |

(वर दर्शविलेले मुलांच्या पासाचे दर ५ वर्षापेक्षा जास्त व १२ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी आहेत.)

या योजनेचे मुख्य नियम खालील प्रमाणे:

१. या योजनेअंतर्गत ७ व ४ दिवसाचे पास दिले जातील.

२. विनावातानुकुलीत शयनयान व शयन आसनी बससेवेचे पास हे साध्या सेवा (साधी, जलद, रात्रसेवा, शहरी, मिडीबस) व निमआराम, बसमध्ये अनुज्ञेय राहतील.

३. आंतरराज्य वाहतूकीवरील बसेससाठी दिला जाणारा पास साधी सेवा (साधी, जलद, रात्रसेवा, शहरी, मिडीबस) व निमआराम सेवेच्या बसेसमध्ये महाराष्ट्र राज्यातसुध्दा वैध राहील.

४. उच्च दर्जाच्या सेवेचा पास निम्न दर्जाच्या सेवेस वैध राहील. शिवशाही बससेवेचा पास विनावातानुकुलीत शयनयान व शयन आसनी बससेवेसाठी वैध राहील.

५. •या योजनेचे पास प्रवास सुरू होण्याच्या १० दिवस अगोदरपर्यंत देण्यात यावा.

६. या योजनेअंतर्गत देण्यात आलेले पास नियमीत गाडीसोबतच कोणत्याही जादा बसमध्ये किंवा पंढरपूर / आळंदी, गौरी गणपती, होळी, इत्यादि प्रसंगी सोडण्यात येणा-या जादा बसमध्ये किंवा यात्रा बसमध्ये वैध राहातील.

७. आवडेल तेथे कोठेही प्रवास पास धारकास जादा बसमध्ये किंवा पंढरपूर / आळंदी, गौरी-गणपती, होळी इत्यादि प्रसंगी सोडण्यात येणा-या बसमध्ये किंवा यात्रा बसमधून प्रवास करण्यास परवानगी दिल्याने ते पास धारक आहेत म्हणून त्यांना प्रवास नाकारू नये व जेणेकरून प्रवाशांना त्यामुळे कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेऊन तशा सुचना संबंधित कर्मचा-यांना देण्यात याव्यात.

८. सदर पासावर प्रवास करणा-या प्रवाशाना ते पासधारक आहेत म्हणून प्रवास नाकारू नये परंतु पास धारकांसाठी जादा अथवा खास बस सोडू नये.

९. गाडीतील आसनासाठी हमी देता येणार नाही. परंतु या योजनेतील पास धारकांना आसन आरक्षित करावयाचे असल्यास तो आपल्या बसचे आरक्षण करू शकतो. त्यासाठी त्यास आरक्षणाचा प्रचलित आकार देऊन आरक्षणाचे तिकीट घ्यावे लागेल. मात्र आरक्षण तिकीटावर पासाचा क्रमांक घातला पाहिजे.

१०. या योजनेअंतर्गत प्रौढ पासधारकास २० किलो पर्यंत व मुलास १० किलोपर्यंतचे सामान विनाआकार नेता येईल.

११. प्रत्येक पासावर पासधारकाचा फोटो लावणे आवश्यक राहील.

१२. विनावातानुकुलीत शयनयान व शयन आसनी बससेवेचे आवडेल तेथे प्रवास योजनेअंतर्गत ७ दिवस व ४ दिवस पासाचे मुल्य हे निमआराम (हिरकणी) बससेवेच्या पासांचे समकक्ष असल्याने नवीन पासांची छपाई होऊन उपलब्ध होईपर्यंत निमआराम (हिरकणी) बससेवेचे पासावर
" विनावातानुकुलीत शयनयान व शयनआसनी बससेवेसाठी ग्राहय " असा रबरी शिक्का मारुन हिरकणी सेवेचे पास वापरण्यात यावेत.

१३. राप / वाह / सामान्य - ८८ / ८०७२ दिनांक २.११.१९९८ - वाहतूक खाते परिपत्रक क्र.३०/१९९८ अन्वये दिलेल्या सुचनांनुसार घरातील नातलगाचा मुत्यू, भुकंप, आग लागणे, अतिवृष्टी, महापूर नैसर्गिक आपत्ती इत्यादी कारणांमुळे पासधारकास पास रद्द करावयाचा असल्यास व त्याने तसे प्रवासाच्या तारखेपुर्वी पुराव्यासह कळविले असल्यास प्रत्येक पासामागे रू.१०/- सेवा शुल्क वसुल करून उर्वरीत रकमेचा त्यास परतावा देण्यात यावा. परंतु अशा बाबतीत सदर पासावर पुढील तारखेस प्रवास करण्याची प्रवाशाची इच्छा असल्यास त्याचा जुना पास रद्द करून त्याला नवीन पास देण्यात यावा, अशा प्रकरणी सेवा शुल्क आकारू नये. यासाठीचे अधिकार विभागीय वाहतूक अधिकारी / आगार व्यवस्थापक याना देण्यात आलेले आहेत.

१४. वाहतूक खाते परिपत्रक क्र.३९/२००६- राप / वाह / चालन / सा.८८ / ६७१० दिनांक ९ ऑक्टोबर,२००६ अन्वये जर एखादा प्रवासी अचानक आजारी झाला व त्यास प्रवास करणे शक्य नसेल आणि त्याने तसा वैद्यकिय दाखला सादर केल्यास त्यास हा पास रद्द करताना पुर्वी घेत असलेले सेवा शुल्क रू.१०/- आकारून पास रद्द करावा, जर त्या प्रवाशाची नंतर प्रवास करण्याची इच्छा असेल व त्याने तारीख बदलून किंवा नवीन पास मागितल्यास त्यास जुना पास रद्द करून नवीन पास देण्यात यावा. जुना पास रद्द करून नवीन पास देताना सेवा शुल्क आकारू नये. सदरचे अधिकार हे पुर्वी प्रमाणेच विभागीय वाहतूक अधिकारी / आगार व्यवस्थापक याना देण्यात आलेले आहेत.

१५. या योजनेत पासधारकाचा प्रवास संपल्यानंतर पास परत करावयाचा नसल्याने त्याचा गैरवापर टाळण्याच्या दृष्टीने सर्व तपासणी कर्मचा-यानी तसेंच वाहकानी या पासावर प्रवास करणा-या पास धारकाच्या पासाच्या कालावधीची खात्री करावी.

१६. नवीन पासांची छपाई होईपर्यंत विभागानी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या पासावर वर नमूद केल्यानुसार रबरी शिक्का मारुन आपली गरज भागवावी व नवीन पासांसाठी आपली मागणी विभाग नियंत्रक, रा.प. मुंबई, भांडार विभाग, कुर्ला, रा.प.कुर्ला यांचेकडे नोंदवावी.

१७. नवीन मुल्याच्या पासांची छपाई करतांना सदर पासांचे मुल्य निमआराम सेवेप्रमाणेच असल्यामुळे नवीन पास छपाई करताना निमआराम / विनावातानुकुलीत शयनयान / शयन आसनी बसेससाठी ग्राहय असे नमूद करुन छपाई करण्याबाबत महाव्यवस्थापक (भांवख) विनंती करण्यात येत असून विभागांच्या मागणीनुसार महाव्यवस्थापक (भांवख) / विभाग नियंत्रक मुंबई यांनी पासांची छपाई करावी.

१८. पास हरविल्यास त्याचे ऐवजी दुसरा पास देण्यात येणार नाही त्यामुळे हरविलेल्या पासावर या योजनेखाली प्रवास करता येणार नाही, तसेंच डुप्लीकेट पास मिळणार नाही. सदर हरविलेल्या पासाचा कोणताही परतावा मिळणार नाही.

१९. सदरचा पास अहस्तांतरणीय राहील. तसेंच या पासावर खाडाखोड केल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही.

२०. प्रवासात गाडी नादुरूस्त झाल्यास, वैयक्तीक वस्तु हरविल्यास अथवा कोणतेही नुकसान झाल्यास महामंडळ जबाबदारी स्विकारणार नाही.

२१. आवडेल तेथे कोठेही प्रवासाच्या पासाच्या दिवसाची गणना ००.०० ते २४.०० अशी करण्यात येते. प्रवासी ७ किंवा ४ दिवसाचा पास घेऊन ज्यावेळी प्रवास करीत असतो व त्या पासाच्या प्रवासाच्या शेवटच्या दिवशी रात्री २४.०० वां. पास संपल्याने वाहकाने सदरचा पास तपासणे आवश्यक आहे. पासाच्या मुदतीच्या शेवटच्या दिवशी जर रात्री २४.०० नंतर पास संपला असेल व प्रवासी प्रवास करीत असेल तर ज्या ठिकाणी पास संपला असेल तेथून पुढील प्रवासाठी त्याचेकडून पुढील प्रवासाचा आकार वसुल करणे आवश्यक आहे अन्यथा त्याच्या पासाची मुदत संपल्याने व पुढील प्रवासाचे तिकीट न घेतल्याने तो विनातिकीट प्रवास करीत असल्याचे सिध्द होईल, परंतु पास संपल्याने प्रवासाचे पुढील तिकीट घेणे ही प्रवाशाची जबाबदारी आहे त्याचप्रमाणे मार्गात पास तपासून पुढील प्रवासाचे तिकीट देणे ही वाहकाची जबाबदारी राहील.

२२. काहीवेळा रा.प.बसेस उशिरा सुटल्यामुळे, वाटेत बिघाड झाल्यामुळे अगर वाटेतील अडथळ्यामुळे शेवटच्या दिवशी म्हणजे पासाची मुदत संपल्याच्या दिवशी जी बस २४.०० वाजणेपुर्वी इच्छितस्थळी पोहोचणार होती ती ००.०० वाजलेनंतर पोहोचते त्यामुळे पासाची मुदत संपली म्हणून पासधारकांकडून जादा भाडे वसुल केले जाते, तसा आकार वसुल करू नये. परंतु सदरची बस ००.०० पुर्वी सुटली असल्यासच व पासधारक प्रवाशाचा प्रवास खंडीत झाला नसल्यास ही सवलत देता येईल.

२३. या योजनेस प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे, तरीही वेगवेगळ्या माध्यमाद्वारे जसे, हॅण्डबिल्स, ध्वनीक्षेपकाद्वारे, स्थानिक वर्तमानपत्रे, रेडिओ, टी.व्ही.वर बातम्या देऊन बसस्थानकावर माहिती पत्रके चिकटवून प्रसिध्दी देण्यात यावी. प्रवाशांच्या माहितीसाठी बसस्थानकावर दर्शनी भागात बोर्ड लावावा व त्यात या योजनेचे नियम व दर यांची माहिती नमूद करून जास्तीतजास्त प्रसिध्दी करावी.

सदर परिपत्रकात दिलेल्या सूचनाची अंमल बजावणी करून पुर्तता अहवाल दयावा.

परिपत्रकाची पोहोच द्यावी.

महाव्यवस्थापक (वाहतूक)

प्रत: मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे सचिव याना विनंती करण्यात येते की, सदर प्रवासी भाडेदरातील बदलाबाबतची माहिती मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना अवगत करावी.

प्रत: मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) / महाव्यवस्थापक (भांवख) / महाव्यवस्थापक (यं.अ.) / उपमहाव्यवस्थापक (नियोजन) / उपमहाव्यवस्थापक (विधि) / मुख्य स्थापत्य अभियंता / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिक / कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / मुख्य कामगार अधिकारी यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत: जनसंपर्क अधिकारी, रा.प.मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी, त्यांना कळविण्यात येथे की, विनावातानुकुलीत शयनयान व शयन आसनी बससेवेसाठी आवडेल तेथे प्रवास पास योजना अनुज्ञेय करण्यात आलेबाबत योग्य ती प्रसिध्दि देण्यात यावी.

प्रत: उपमहाव्यवस्थापक (संगणित्र) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी, त्यांना कळविण्यात येते की, विनावातानुकुलीत शयनयान व शयन आसनी बससेवेसाठी आवडेल तेथे प्रवास पास योजना अनुज्ञेय करण्यात आली असल्याने संगणकीय कार्यप्रणालीमध्ये सदरचे पास उपलब्ध करुन देण्याबाबत मे.ट्रायमॅक्स आय टी इन्फ्रास्ट्रक्चर अँड सर्व्हिसेस लि यांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

प्रत: महाव्यवस्थापक (अपील), रा.प.पुणे / उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

प्रत: कार्यशाळा व्यवस्थापक, मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी/ औरंगाबाद / नागपूर.

प्रत: विभाग नियंत्रक (भांडार), भांडार विभाग कुर्ला, / अधिक्षक, रा.प.मुद्रणालय, मुंबई - ८६ याना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी. त्याना कळविण्यात येते की, विनावातानुकुलीत शयनयान व शयन आसनी बससेवेसाठी आवडेल तेथे प्रवास पास योजना अनुज्ञेय करण्यात आली असल्याने उपरोक्त परिपत्रकात मुददा क्र. १७ मध्ये नमूद केलेल्या आवडेल तेथे कोठेही प्रवास योजनेच्या प्रमाणे कार्यवाही करुन विभागाना त्यांचे मागणीनुसार नवीन मुल्याचे पास आवश्यकतेनुसार मुद्रीत करून ते वितरीत करावेत.

प्रत: मे.ट्रायमॅक्स आय टी इन्फ्रास्ट्रक्चर अँड सर्व्हिसेस लि.,कॅम्प संगणित्र शाखा, मध्यवर्ती कार्यालय, अॅनेक्स बिल्डींग,मुंबई यांना माहिती व वरील प्रमाणे कार्यवाहीसाठी.

सही/-
महाव्यवस्थापक (वाहतूक)